# दोन तेजस्वी तारका: बहिणाबाई आणि बहिणाबाई

डॉ. सौ. वीरा मांडवकर
सहायक प्राध्यापक, इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ
इ मेल : pavanmandavkar@yahoo.com भ्रमणध्वनी ९४०३०१४८८५

## गोषवारा :

'अरे संसार संसार, जसा तवा चुल्हयावर' म्हणत सोप्या रसाळ भाषेत जीवनाचे तत्त्वज्ञान सांगणाऱ्या बहिणाबाई चौधरींचे नाव माहीत नाही, असा एकही अभ्यासक महाराष्ट्रात सापडणार नाही आणि 'ज्ञानदेवे रचिला पाया, तुका झालासे कळस' या वारकरी संप्रदायाच्या प्रवासाचा अभंग रचणाऱ्या संत बहिणाबाईंचे नाव संत वाड्.मयात अत्यंत आदराने घेतले जाते, याची जाणीव नसणारा वाचकही कुठे आढळणार नाही. तरीही संत बहिणाबाई आणि निसर्गकन्या बहिणाबाई या वेगवेगळ्या आहेत हे फार कमी लोकांना माहीत आहे. सतराव्या शतकात संत तुकारामांच्या शिष्या म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संत बहिणाबाई यांच्या बाबतीत अनेक चमत्कारिक कथा प्रसिद्ध आहेत. शके 1557 मध्ये जन्मलेल्या संत बहिणाबाईंनी आपले तेरा जन्म पुत्राला कथन केले होते आणि शके 1622 मध्ये पूर्वकल्पना देऊन देह ठेवला. निसर्गकन्या बहिणाबाई चौधरी यांचा जन्म इ.स. 1880 मध्ये नागपंचमीला झाला आणि 1951 साली 3 डिसेंबरला विनोबांची गीताई श्रवण करीत असताना त्यांनी प्राण ठेवला. दोन्ही कवयित्रींचा कालखंड, पार्श्वभूमी, परिस्थिती पूर्णतः वेगळी असली तरी अनुभूतीमुळे त्यांच्यात काही साम्य आढळते. त्यांच्या कष्टमय चरित्रांची पार्श्वभूमी, त्यावर त्यांनी गाठलेली अध्यात्मिक उंची, संसाराचा गाडा ओढताना त्यातूनच आपला आनंद शोधणे, जीवनाच्या पाउलवाटेवरचे आपले अनुभव काव्यातून टिपणे, साध्या संसारी स्त्रियांचे हे अनुभव रसिकांना अनुपम्य असा काव्यानंद देणारे असणे अशा अनेक गोष्टी त्यांच्या बाबतीत समान आहेत. म्हणूनच साहित्य नभात या दोन तेजस्वी तारका आजही आपल्या तेजाने तळपत आहेत.

## Abstract:

Not a single researcher can be found in Maharashtra who does not know the name of Bahinabai Chaudhary, who speaks the philosophy of life in a simple juicy language saying 'Are sansar sansar, jasa tava chulhyawar' and the reader who is unaware that the names of the Saint Bahinabai who has shown the journey of the Warkari sect through composition 'Dnyandeve rachila paya, Tuka zalase kalas' is treated with utmost respect in Saint Literature. Yet very few people know that Saint Bahinabai and Nature's daughter Bahinabai are different. In the seventeenth century, a number of miraculous stories are made about Saint Bahinabai, who was Saint Tukaram's disciple. Born in 1557 (Indian Year), Saint Bahinabai told her 13 births to son, and in 1622 (Indian Year), she left the soul, which information given earlier by her. Bahinabai Chaudhary was born in 1880 on the day of Nagpanchami and died on December 3, 1951, while listening to the song of Vinoba. Though the time period, backgrounds of the poetess are completely different, there are some similarities between them. They have many things in common, such as the background of their painstaking life, the spiritual heights they have reached, the happiness they find when pulling a carriage of life, the experiences of ordinary worldly women that are unique to them. That is why these two luminous stars are still shining as brightest in literature.

**बीजशब्द** – कविता, स्त्री, आध्यात्म, कष्ट, काव्यसौदर्य

## प्रस्तावना –

अपार कष्ट करून स्वत:च्या बळावर संतप्रभावळीत महत्त्वाचे स्थान प्राप्त करणाऱ्या बहिणाबाईंचे जीवन अनेक रहस्यांनी भरलेले असूनही आदर्शवत आहे. बहिणाबाईंनी मानवी जीवनाच्याच नव्हे तर सृष्टीच्या विविध कक्षांना स्पर्श केला आहे. मानवी जीवनातले आणि पारमार्थिक जीवनातले कितीतरी अनुभव बहिणाबाईंच्या कवितांचे विषय झाले आहेत. लौकिक अनुभव, अलौकिक अनुभव अशा दोन्ही प्रकारांत बहिणाबाईंची कविता आशयबद्ध झालेली आहे. लौकिक अनुभवात मानवी जीवनातील सत्यानुभूतीचा शोध घेण्याचा प्रयत्न बहिणाबाईंनी केला आहे, तर अलौकिक अनुभवात पारमार्थिक सत्यानुभुतीचा शोध घेतला आहे.

कवीही जन्माला यावा लागतो आणि कविताही. वाङ्मयाचा प्रारंभबिंदू कविता हाच आहे, ह्यात दुमत नाही. भल्या भल्या दिग्गजांच्या कविता जेव्हा समग्र महाराष्ट्राला भुरळ घालत होत्या, संत, पंत, तंत रचनांचे आदर्श कपाळावर चिकटवून कविता प्रसवली जात होती आणि मराठी सारस्वतात दर्जेदार म्हणून वाखाणल्या जात होती, त्याच वेळी खानदेशातील जळगावात राहणाऱ्या एका शेतकरी कुटुंबातील एक अडाणी स्त्री आपल्यावर कोसळणाऱ्या प्रत्येक संकटांचा सामना करीत, शेतात राबताना किंवा जात्यावर दळताना संसाराची गाणी गात होती. काळ्याशार भूमीत रसरशीत अंकुरासारखी ती रुजली, वाढली आणि त्या भूमीची गाणी तिने गायली. अक्षराचाही गंध नसलेल्या या स्त्रीने मौलिक आणि आशयघन असे काव्य महाराष्ट्राला दिले. जीवनाचे तत्त्वज्ञान कुणीही पहिले सांगितले नसेल इतक्या सोप्या भाषेत सांगणाऱ्या या महान कवयित्रीचे नाव होते — बहिणाबाई चौधरी. या दोघींच्या जीवनचरित्रासोबतच त्यांच्या काव्यविष्वाचा आढावा घेण्याचा प्रयत्न या लेखाद्वारे करण्यात आला आहे.

## संत बहिणाबाई यांचे लौकिक चरित्र:

बहिणाबाईचे चरित्र म्हणजे तत्कालीन स्त्रीजीवनाचा आरसाच होय. बहिणाबाईंच्या चरित्रात त्यांच्या साधकावस्थेच्या मार्गात अडचणीच जास्त आलेल्या दिसतात. एक सामान्य मुलगी आपली भक्तीची उत्कट इच्छाही पूर्ण करू शकत नाही. त्याकरिता तिला आप्तांकडून, समाजाकडून फार मोठा विरोध सहन करावा लागतो. मात्र हा विरोध आणि त्रास सहन करीत, विरोधाचा सामना करीत अखेर आपल्या इच्छित स्थळी पोचणाऱ्या बहिणाबाईंच्या व्यक्तिमत्त्वाचा विजय झालेला दिसतो.

बहिणाबाईंचा जन्म देवगाव या गावी शके १५५० म्हणजेच इ.स. १६२८ साली झाला. वाजसनेयी शाखेचे यजुर्वेदीय ब्राह्मण असलेल्या माता जानकी व पिता आऊजी कुळकर्णी यांच्या घरी हे कन्यारत्न जन्माला आले. बहिणाबाईंच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंवर नजर टाकताना लक्षात येते की, त्या आलेल्या परिस्थितीला आपले नशीब मानून ती परिस्थिती निभावून नेणाऱ्या एक स्त्री आहेत. त्यांचा विवाह वयाच्या तिसऱ्या वर्षीच झाला. त्या काळातील चालीरीती पाहता हे बरोबर असेलही; परंतु त्यांचा विवाह एका तीस वर्षीय बिजवराशी झालेला आहे. बहिणाबाईंचे हे वय म्हणजे न कळणारे वय होय; परंतु पुढेही या प्रकाराबद्दल त्या कुठलीही तक्रार करताना दिसत नाहीत किंवा त्यांच्या काव्यात नाराजीचा सूरही उमटलेला नाही. त्यांचे चरित्र त्यांच्या अभंगांतूनच प्रकटते. त्यांची नाराजी, खेद, तक्रार त्या त्यातून मांडू शकल्या असत्या; पण उलट त्या म्हणतात,

*'द्वितीय समंधी वरुषा तिसाचा । नोवरा भाग्याचा ज्ञानवंत ।।*
*बहेणि म्हणे त्यासी कन्यादान केले । आंदन दिधले सर्व काही ।।'*

(अभंग क्र. ६, ओ. ३, ४)

बहिणाबाईंच्या आणि त्यांच्या पतीच्या वयात एवढे मोठे अंतर असूनही त्यासंबंघाने नाखुषी न दाखवता, उलट पतीची त्या स्तुतीच करतात, हे उल्लेखनीय आहे. पुढे बहिणाबाईंच्या आईवडिलांकडून लग्नात घेतलेले ऋण फेडता न आल्याने कलह निर्माण होऊन त्यांनी गावाचा त्याग केला. बहिणाबाईंच्या भ्रतारासही बोलावून घेतले. अशाप्रकारे बहिणाबाईंचे कुटुंब परागंदा होऊन भटकंती करू लागले. येथेही बहिणाबाई मुकाटपणे आपल्या कुटुंबीयांच्या मागोमाग निघालेल्या दिसतात. गावोगाव भटकंती, भिक्षा मागून उदरनिर्वाह असे कष्टमय जीवन त्यांना व्यतीत करावे लागले. अशा विपरीत परिस्थितीतही गावोगाव होणारे देवदर्शन त्यांना जास्त सुखमय वाटत होते. यावरून त्यांच्या मनातला भक्तिभाव लहानपणापासूनच कसा मूळ धरून होता, हे दिसून येते. त्या म्हणतात,

*'गंगा देखोनिया सिद्धेश्वर देव । तेथोनिया जीव निघो नेणे ।।*
*आवडीचा हेत पूर्वील संस्कार । श्रवणी आदर कीर्तनाचे ।।'*

(अभंग क्र. ८, ओ. १, २)

त्यांच्या अभंगात कुठेही कष्टांचे चित्रण दिसत नाही; उलट देवदर्शनाचे सुख जागोजागी प्रकट झाले आहे. शंभूमहादेवास पाहून त्यांच्या मनात येते की कोरान्नाचे कण आपण सहज कुठेही मिळवू शकू; पण हे असे देवदर्शन मिळवण्यासाठी पुण्यच पाठीशी असावे लागते. यावेळी बहिणाबाईंचे वय केवळ अकरा वर्षांचे होते. इतक्या बालवयात भक्ती रुजल्यामुळे पुढील आयुष्यात या भक्तीचे डेरेदार वृक्षात रूपांतर झाल्याचे दिसून येते.

बहिरंभटाकडे वास्तव्य करीत असताना बहिणाबाईंना रोज भागवत—पुराण ऐकायला मिळू लागले. विद्यार्थ्यांना शिकवले जाणारे वेदपाठ, त्यांच्यात चाललेली आत्मविद्येची चर्चा कानावर पडू लागल्यामुळे आधीच्याच परमार्थसन्मुख मनाला भागवत, वेदपाठाचे संस्कार अधिकच आध्यात्मिकतेकडे बहिणाबाईंना ओढताना दिसतात.

बहिणाबाईंचा पती अत्यंत तापट व संशयी स्वभावाचा होता. बहिणाबाईंनी केवळ भगवत्प्रेमासाठी एवढ्या लहान वयात इतका छळ सोसला, हे ऐकून परम भागवत प्रल्हादाची आठवण कोणास होणार नाही? आपल्या ईशप्रेमात अंतराय आणणाऱ्या भ्रताराचा त्याग करण्याची कल्पनाही बहिणाबाईंच्या मनात आली नाही व आली असती, तरी त्या कालात तसे करणे तिला शक्यही नव्हते. शिवाय अकरा वर्षांच्या मुलीच्या मनात असले विचार कुठून येणार? पती हाच परमेश्वर आणि तो करील ते प्रमाण, ही तत्कालीन स्त्रियांची समजूत. त्यामुळे त्यांची भगवद्भक्ती आणखीनच तेजस्वी झाली असावी, असे वाटते.

बहिणाबाईंचा सद्‌गुरुविषयीचा कळवळा अभंगांतून वारंवार व्यक्त झाला आहे. *'मत्स्य जैसा जळावाचुनि चरपुडी । तैसी ते आवडी तुकोबाची ॥'* असे सद्‌गुरुविषयी म्हणून एखाद्या गोष्टीचा ध्यास घेण्याची वृत्ती त्या दर्शवितात.

बहिणाबाई आध्यात्मिक वृत्तीने भारलेल्या, वत्सल, प्रेमळ, त्यागी, सहनशील, मर्यादाशील, शांत अशा गुणांनी परिपूर्ण दिसतात. त्यांच्या स्वभावाची खरी ओळख तेव्हाच होते, जेव्हा त्यांचा पती 'परमार्थ किंवा मी' असे पर्याय त्यांच्यासमोर ठेवतो. एकीकडे सद्‌गुरूची लागलेली ओढ, जळाशिवाय तडफडणाऱ्या माशासारखे होत असलेले मन तर दुसरीकडे असा भ्रतार, ज्याने आतापर्यंत तिचा छळ केला आहे, तिच्या परमार्थमार्गात जो धोंडा बनून उभा आहे, अशी द्विधा मन:स्थिती होते. तेव्हा बहिणाबाई पतीचा तिरस्कार न करता, पतीशिवाय पत्नीच्या आयुष्याला अर्थ नाही, प्राणाशिवाय देहास जशी शोभा नाही, अशी स्वत:च्या आयुष्यातील पतीची जागा अधोरेखित करीत सद्‌गुरूचा ध्यास सोडण्याचा निर्णय घेतात. त्यांची ही कृती कोणत्याही पतिव्रतेसमोर आदर्श ठेवणारी आहे.

बहिणाबाईंची श्रद्धा होती की, आपल्याला भोगाव्या लागणाऱ्या यातना हा आपल्या जीवनाचाच एक आविभाज्य भाग आहे. तो कसा चुकेल, याची त्यांना भ्रांत नव्हती. उलट असे प्रसंग वारंवार यावेत म्हणजे आपली भक्ती दृढ होईल असा त्या विचार करीत. बहिणाबाईंची परीक्षा घेऊन कदाचित ईश्वराला दया आली असावी; म्हणून त्यांच्या पतीला शारीरिक दाह निर्माण करून विचार करण्यास भाग पाडले. ब्राह्मणाचे रूप घेऊन त्याला दृष्टांत दिला आणि त्याचे मन वळविण्यात यशस्वी झाले. बहिणाबाईंची तप:साधना इतकी दृढ होती, की त्यांच्या मदतीसाठी ईश्वरालाही कार्यरत व्हावे लागले.

बहिणाबाईंच्या व्यक्तिमत्त्वात आमूलाग्र बदल झाला तो तुकारामांचे दर्शन होऊन त्यांचा वरदहस्त लाभल्यावर. त्यांचे अंतरंग जणू सुखाने डोलू लागले. शिवाय त्यांना झालेली कवित्वाची स्फूर्ती. यामुळे आपले अनुभव त्यांनी अभंगरूपात साठवून ठेवण्यास सुरुवात केली. हे अभंग म्हणजेच बहिणाबाईंच्या व्यक्तिमत्त्वाला पूर्णत्वाने आकार देण्यास कारणीभूत ठरले.म्हणूनच 'रामदासांनंतर समर्थ संप्रदाय जसा निष्प्रभ झाला, तसे काही लगेच तुकारामांच्या पश्चात वारकरी संप्रदायाचे झाले नाही. तुकाराम भागवत धर्माचे कळस झाले, तर त्यांची शिष्या बहिणाबाई कळसाच्या ध्वजेप्रमाणे फडकली.'[१] एकूणच *'प्रपंच परमार्थ चालवी समान । तिनेची गगन झेलीयेले ।'* असे म्हणणाऱ्या बहिणाबाईंचे चरित्र आधुनिक स्त्रियांनाही मार्गदर्शक आहे.

## बहिणाबाई चौधरी यांचे लौकिक चरित्र:

'ज्या कालखंडात मराठी सारस्वतातील दिग्गज कवी आपली प्रतिभा महाराष्ट्रावर उधळीत होते, मराठी जनता ज्यांच्या काव्याच्या आस्वादात रंगून गेली होती, त्याच सुमारास खानदेशातील जळगावात राहणाऱ्या एका शेतकरी कुटुंबातील एक अडाणी स्त्री शेतात काम करता करता किंवा जात्यावर दळता दळता संसाराची गाणी गात होती. काळ्यशार भूमीत रसरशीत अंकुरासारखी ती रुजली, वाढली आणि त्या भूमीची गाणी तिने गायली.'[२] पाटीपुस्तक तर दूरच; पण अक्षराचाही गंध नसलेल्या या स्त्रीने मौलिक आणि आशयघन असा काव्यरूपातील हंडाच महाराष्ट्राला बहाल केला. मानवी जीवनाचे तत्त्वज्ञान ज्या अडाणी स्त्रीने आपल्या साध्या, सोप्या पण रसाळ भाषेत, अगदी मोजक्या शब्दात सांगितले आणि समस्त बुद्धिवाद्यांना चकित करून सोडले, अशी ही लोकमाता, भूमीकन्या, निसर्गकन्या बहिणाई म्हणजेच बहिणाबाई चौधरी.

इ.स. १८८० च्या नागपंचमीला बहिणाबाई चौधरींचा जन्म 'आसोदे' (असोदे) ह्या गावी झाला. हे गाव जळगाव शहरापासून अवघे २ मैलांवर होते. बहिणाबाईंचे वडील उखाजी (उखडू) हे गावचे महाजन होते. साहजिकच त्यांच्या घराण्याला गावात प्रतिष्ठा होती. ते कर्तृत्ववान होते. त्यांचा व्यवहार स्वच्छ होता. घरी नेहमीच येणाऱ्या जाणाऱ्यांची रीघ लागलेली असे.

*'बापाजीच्या हायलीत, येती शेट शेतकरी*
*दारी खेटरांची रास, घरी भरली कचेरी'*

('माहेर', 'बहिणाईची गाणी', पृ. ४)

पुढे त्या म्हणतात,

*'गावामधी दबदबा, बाप महाजन माझा*
*त्याचा काटेतोल न्याव, जसा गावामधी राजा'*

('माहेर', 'बहिणाईची गाणी', पृ. ४)

काटेतोल न्याय करणारे वडील 'उखाजी' तर आई 'भीमाबाई' (भीमाई) — सर्वांचे भले चिंतणारी, प्रेमळ स्वभावाची, सर्वांना शीतल छाया देणारी.

*'माय भीमाई माऊली, जशी आंब्याची साऊली'*

('माहेर', 'बहिणाईची गाणी', पृ. ४)

बहिणाबाईंना घन:श्याम, गणपत, धनाजी हे तीन भाऊ तर सीता, तुळसा, अहिल्या ह्या तीन बहिणी होत्या.

*'आम्ही बहिनी आम्हाला, सीता, तुळसा, बहिना*
*देल्या अशीलाचे घरी, सगेसाई मोतीदाना'*

('माहेर', 'बहिणाईची गाणी', पृ. ४)

बहिणाबाईंचा विवाह वयाच्या तेराव्या वर्षी जळगावच्या नथूजी खंडेराव चौधरींबरोबर झाला. माहेराप्रमाणेच सासरचे घराणेही प्रतिष्ठित होते. सासरी सर्व कुटुंब एकत्र राहत होते; पण लवकरच ते कुटुंब विभक्त झाले. वाटण्या झाल्या. वाट्याला आलेल्या घरात, मिळालेल्या मोजक्या जमिनीवर कष्ट करत बहिणाबाई पतीसह राहू लागल्या. २–३ वर्षांनी दुष्काळ पडला. दुष्काळाच्या काळात त्यांना खडी फोडण्याचे कामही करावे लागले. खडतर अशी जीवनाची वाट त्यांच्या वाट्याला आली. वाड्यातले धान्याचे पेव संपले. पेव म्हणजे जमिनीत खोलवर विहिरीप्रमाणे खणून, शेणाने सारवून, लिंपून त्यात धान्य साठवले जाते. इंग्रज सरकारने जळगावच्या मेहेरूण गावाला दुष्काळी काम म्हणून तलाव बांधायचे ठरवले. बहिणाबाईही शेती सोडून कामावर गेल्या. बहिणाबाईंनी जो देवाचा प्रथम शोध घेतला तो या परिस्थितीत. 'टाया पिटिसन देव भेटत नाही' हे त्यांनी जाणले. 'ज्याच्या हाताला घट्टे, त्याले देव भेटे।' हे त्यांना पटले.

बहिणाबाईंना दोन मुले आणि एक मुलगी झाली. ओंकार, सोपान आणि काशी. दुर्दैवाने तिशीच्या आतच त्यांच्यावर वैधव्याची आपत्ती कोसळली. त्या काळात स्त्रीचा आधार म्हणजे पतीच असे. जोडीदार गेला म्हणजे संसाररथाचे एक चाकच निखळले.

*'अरे रडता रडता, डोये भरले भरले*
*आसू सरले सरले, आता हुंदके उरले!...*
*सांग सांग धर्ती माता, अशी कशी जादू झाली*
*झाड गेलं निंघीसनी, मांघे सावली उरली!'*

('आता माझा माले जीव', 'बहिणाईची गाणी', पृ. २२)

बहिणाबाईंना आता जगायचे होते ते मुलांसाठी.

'देव गेले देवाघरी, आठी ठेयीसनी ठेवा
डोयापुढे दोन लाल, रडू नको माझ्या जीवा'

('आता माझा माले जीव', 'बहिणाईची गाणी', पृ. २२)

असा स्वत:ला धीर देऊन त्यांनी जीवन मार्ग पुढे आक्रमित केला; पण 'सुख पाहता जवापाडे, दु:ख पर्वताएवढे' या उक्तीप्रमाणे बहिणाबाईंवर संकटेच अधिक आली. त्यांची मुलगी काशी हिचे लग्न बालवयात झाले. तिला सासरी फारसे सुख लाभू शकले नाही. मोठा मुलगा ओंकार हा प्लेगमधून वाचला; पण अपंग झाला. ओंकारच्या पत्नीलाही संसार सावरण्यासाठी कष्ट करावे लागले. त्यांना पांडुरंग नावाचा मुलगा होता. बहिणाबाईंचा दुसरा मुलगा म्हणजेच कवी सोपानदेव चौधरी. सोपाननेही पहिल्या पत्नीला घटस्फोट दिला व दुसरा प्रेमविवाह केला. ही सगळी संकटे बहिणाबाईंनी एकट्याने पचवली.

सोपानदेवांनी पत्नी लीलादेवींबरोबर नाशिकला बिऱ्हाड केले. तिथे बहिणाबाई जात असत. तिथे बहिणाबाईंचा लक्ष्मीबाई टिळक, जानकीबाई साठे अशा मोठ्या व्यक्तींशी परिचय झाला. त्या परिचयातून, चर्चेतून काव्य अधिक फुलले. संकटांना दूर सारताना त्या स्वत:च्या मनाला समजावत,

*'रडू नको माझ्या जीवा, तुले रडाची रे सव*
*रडू हासव जरा, त्यात संसाराची चव'*

('आता माझा माले जीव', 'बहिणाईची गाणी', पृ. २२)

तरीही अनेकदा कर्जबाजारीपणामुळे त्यांचा जीव व्यथित व्हायचा. हातातोंडाची गाठ जोडताना पांडुरंगाला त्या म्हणतात,

*'अरे पांडुरंगा तुझी, कशी भक्ती करू सांग*
*तुझ्या रूपाआड येतं, सावकाराचं रे सोंग'*

('स्फुट ओव्या', 'बहिणाईची गाणी', पृ. ८९)

पण बहिणाबाईंच्या संघर्षातही सकारात्मक पैलू जाणवतो. तळागाळातील माणसांच्या दु:खाचा, वेदनांचा वेध त्या घेतात. परमेश्वरावर डोळस श्रद्धा ठेवतात; पण त्यापेक्षा अधिक विश्वास आपल्या कर्तृत्वावर ठेवतात. 'माझी माय सरसोती, माले शिकवते बोली' असे सांगणाऱ्या बहिणाबाईंनी जीवनाच्या तत्त्वज्ञानाची उकल करून अनेक गुपिते काव्यातून उघड करून अनमोल असा ठेवा जगाला दिला आहे.

३ डिसेंबर १९५१ रोजी बहिणाबाईंनी इहलोकाचा निरोप घेतला.

## दोन्ही बहिणाबाईंच्या चरित्रांची तुलना:

प्रपंच व परमार्थ दोन्ही गोष्टी साध्य करण्यामागे संत बहिणाबाईंची झालेली ओढाताण, त्यांनी केलेले कष्ट, इच्छाशक्ती या सर्वच गोष्टी त्यांचे उच्च कोटीचे कर्तृत्व दर्शवितात. त्यांनी लिहिलेले सुमारे सव्वासातशे अभंग म्हणजे त्यांच्या सर्वस्पर्शी व्यक्तिमत्त्वाची ओळख आहे. दुसरीकडे बहिणाबाई चौधरी यांच्यावर वैधव्याची कुऱ्हाड कोसळल्याने संसारात त्यांनाही भरपूर कष्ट

करावे लागले. मात्र परमार्थ हेच त्यांचे ध्येय नव्हते. संत बहिणाबाईंकरिता परमार्थ हे साधन आणि साध्य होते तर बहिणाबाई चौधरींनी अध्यात्माकडे केवळ एक चिरंतन सत्य म्हणून पाहिले. अध्यात्म हा त्यांच्या जगण्याचा आधार होता, असे म्हणता येणार नाही; मात्र अध्यात्माला त्यांनी नाकारले नाही. संत बहिणाबाई आणि बहिणाबाई चौधरी दोघीही कुटुंबवत्सल होत्या. एक मुलगी म्हणून आदर्श होत्या. एक पत्नी म्हणून आदर्श होत्या. त्या आदर्श माता होत्या. पुत्रांवर उत्तम संस्कार करून त्यांनी त्यांना घडविण्यामध्ये कुठलीही कसर ठेवली नाही.

तुकोबांनी स्वप्नात येऊन आशीर्वाद दिला. कपाळाला स्पर्श केला आणि संत बहिणाबाईंच्या रचना फुलल्या. बहिणाबाई चौधरींनी प्रवचन, कीर्तनाच्या श्रवणातून, परमेश्वराच्या भक्तीत तल्लीन होऊन जीवनानुभूतीतून काव्यरचना केली. 'माझी माय सरसोती, माले शिकवते बोली' असे त्या सांगत. त्यांची गाणी संतसामान्यांना समजेल अशा सोप्या भाषेत आहेत. जात्यावर दळता दळता, शेतात घाम गाळताना सहजस्फूर्त ती त्यांच्या मुखावाटे बाहेर पडली आहेत.

## संत बहिणाबाईंच्या काव्यातील वैशिष्ट्ये:

बहिणाबाईंच्या विषयवैविध्याला तोड नाही. अध्यात्म ही एक बाजू, त्यात अनेक विषय, समाजप्रबोधन ही दुसरी बाजू, त्यातही अनेक विषय, या दोन्हींतून साकार झालेले त्यांचे लांबलचक तत्त्वज्ञान आणि हे तत्त्वज्ञानाचे डोस श्रोतेरसिकांना पाजत असताना काठिण्याला थाराही नाही. स्त्रियांशी हितगूज असो किंवा ब्राम्हण्यावरील आघात, त्यांची वैविध्यपूर्ण लेखणी तितक्याच सक्षमतेने पुढे येते. गुरुगौरव करायचा असो किंवा चरित्रकथनाच्या ओघात येणारे व्यक्तिचित्रण, त्यात नावीन्य सातत्याने येते, हा संत बहिणाबाईंच्या लेखणीतील वैविध्याचा आविष्कार कौतुकास्पद आहे.

बहिणाबाईंनी मानवी जीवनाच्याच नव्हे तर सृष्टीच्या विविध कक्षांना स्पर्श केला आहे. मानवी जीवनातले आणि पारमार्थिक जीवनातले कितीतरी अनुभव बहिणाबाईंच्या कवितांचे विषय झाले आहेत. लौकिक अनुभव, अलौकिक अनुभव अशा दोन्ही प्रकारांत बहिणाबाईंची कविता आशयबद्ध झालेली आहे. लौकिक अनुभवात मानवी जीवनातील सत्यानुभूतीचा शोध घेण्याचा प्रयत्न बहिणाबाईंनी केला आहे, तर अलौकिक अनुभवात पारमार्थिक सत्यानुभूतीचा शोध घेतला आहे.

अलंकारसौंदर्याचा विचार करताना त्यात अनुप्रास व यमक हे शब्दालंकार आणि उपमा, दृष्टांत, रूपक, मालारूपक, अपन्हुती, विरोधाभास, प्रश्नालंकार, चैतन्यारोप, अनन्वय, काव्यमय अत्युक्ती, व्यतिरेक, श्लेष, पर्यायोक्त, निदर्शना, व्याजस्तुती, एकावली, अर्थान्तरन्यास, परिकर ह्या बहिणाबाईंच्या काव्यात आढळतात. करुणरस, वत्सलरस, शृंगाररस, अद्‌भुतरस, हास्यरस, भयानकरस, बीभत्सरस, वीररस, रौद्ररस, भक्तिरस आणि शांतरस हे रस बहिणाबाईंच्या काव्यात बहरलेले आहेत. काव्यसौंदर्याचा शोध घेताना बहिणाबाईंची प्रतिमासृष्टी, संत बहिणाबाईंच्या अभंगांतील विचारसौंदर्य यांना तोड नाही हेच खरे. बहिणाबाईंच्या काव्याची सौंदर्यात्मक वैशिष्ट्ये म्हणजे केवळ रसालंकारांपुरते मर्यादित राहून चालत नाही. त्यांचे विचार, त्यांचे रचनाकौशल्य, भाषेवरील प्रभुत्व या सर्गीयांमुळेही त्यांच्या काव्याला सौंदर्याचा उच्चाविष्कार साधता आला आहे, हे लक्षात घ्यावे लागते.

त्यांच्या काव्यातून प्रगटणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व विलोभनीय असे आहे. वेदनिष्ठा, विठ्ठलभक्ती, गुरुभक्ती, अद्वैत तत्त्वज्ञान, संतनिष्ठा यांप्रमाणेच पतिनिष्ठा हे पैलू त्यांच्या काव्यात आढळतात. त्यांचे काव्य प्रासादिक व तत्त्वज्ञानसंपन्न आहे. विवेक, चिंतनशीलता, ज्ञाननिष्ठा, व्युत्पन्नता, या गुणांप्रमाणेच बहुश्रुतता हाही गुण त्यांच्या काव्यात आहे. त्यांचे व्यक्तिमत्त्व त्रिविध तापांनी पोळल्यामुळे निर्माण झालेले नसून ते जन्मजात आहे. स्वत:ला स्त्रीजन्म प्राप्त झाला, म्हणून त्यांनी उद्वेग व्यक्त केला आहे, तरी स्त्रीजीवनाच्या मर्यादा, लक्ष्मणरेषा सांभाळून आत्मज्ञानसंपन्न होण्याचा पुरुषार्थ त्यांनी करून दाखविला आहे. प्रपंचात पतीने छळ केला; पण त्याविरुद्ध 'ब्र'ही उच्चारला नाही. सामाजिक जीवनात दांभिक मंबाजीने छळ केला तरी कोठे पुरुषनिंदा केली नाही. बहिणाबाईंचे काव्य सोज्ज्वळ आणि पवित्र आहे. विचारसरणी प्रगल्भ आहे. परिणामी त्यांची कविता वेगळ्या पातळीवर पोचली आहे.

बहिणाबाईंना गुरुकृपा झाली ती चमत्कारी हकीकत त्यांच्या भाविकतेची साक्ष पटविते. त्यांनी केलेला गुरुगौरव असामान्य आहे. गुरुभक्तीचा इतका सुंदर आविष्कार बहिणाबाईंशिवाय इतर स्त्रीसंतांच्या रचनांत आढळत नाही. वज्रसूची अनुवादातील त्यांचे भाष्य परखड आणि वैचारिक क्रांतिकारकत्व प्रगट करते. त्यांची चिंतनशीलता प्रगल्भ होती.

'प्रतिमा ही संकल्पना संवेदनागर्भता आणि साधर्म्यवैधर्म्याधीश्ठत रुपकप्रक्रिया या दोहोंच्या सहकार्यातून पूर्ण होते.'——सई देषपांडे, 'प्रतिमाविचारांची रुपरेशा, अनुभवामृतातील प्रतिमासृश्टी,प्रथमावृत्ती, देविका प्रकाषन, ठाणे, १९९४, पृ. २८ प्रत्येक संतांची प्रतिमासृष्टी काहीना काही विशेष धारण करून अवतीर्ण होत असते. बहिणाबाईंची प्रतिमासृष्टी बरीच विस्तृत, व्यापक आणि अर्थगर्भ असल्याचे जाणवते. त्यांच्या प्रतिमाविश्वात सूर्यापासून क्षुद्र कीटकांपर्यंत, ब्रम्हापासून देहापर्यंत, निराकारापासून साकारापर्यंत अशा सर्व तऱ्हेच्या प्रतिमांचा संचार आहे. त्यांनी विविध विषयांवरच्या प्रतिमा योजल्या असल्या तरी कधी कधी त्यात पुनरावृत्तीही होते. तरीदेखील बहिणाबाईंची प्रतिमासृष्टी निश्चितच अर्थसंपृक्त, वैविध्यपूर्ण आहे. संस्कृत व मराठी वाङ्मयात रूढ असलेले अनेक काव्यसंकेत बहिणाबाईंच्या अभंगांत आढळतात. त्यांच्या काव्यात अलौकिक प्रतिभाविलास जाणवतो, तो प्रशंसनीय आहे. अहिणाबाईंनी कित्येकदा अनावधानाने तर कित्येकदा जाणूनबुजून ग्राम्य अभिव्यक्ती आपल्या काव्यात केली आहे. कर्मठांचे ढोंग, अभक्त ब्राम्हण, क्षुद्र देवीदेवतांचे पूजन यावर प्रहार करताना त्यांनी शिव्यांचाही वापर केला आहे. समाजातील दुष्ट प्रवृत्तींचा विनाश

व्हावा, समाजाची रजतमगुणांकडून सत्वगुणाकडे प्रवृत्ती वळावी, ही त्यांची आस आहे. त्यांच्या काव्यातील उदात्त ध्येयापुढे ग्राम्यता विरून जाते. त्यांच्या लोकोद्धाराच्या विलक्षण कळवींयातून काव्यात परखडता येते आणि ग्राम्य अभिव्यक्तीतही एक प्रकारच्या सजीवतेचे सामर्थ्य दिसून येते. असे हे बहिणाबाईंचे काव्य कितीतरी सौंदर्यात्मक पैलूंनी सजलेले आहे. बोटावर मोजण्याइतके सौंदर्यबाधक दोष सोडले तर त्यांची कविता सौदर्याचा शब्दाविष्कारही आहे आणि भावाविष्कारही आहे.

## बहिणाबाई चौधरींच्या कवितांची वैशिष्ट्ये:

बहिणाबाई चौधरी यांचे जीवन कष्टमय असे व्यतीत झाले. दुर्दैवाने तिशीच्या आतच त्यांच्यावर वैधव्याची आपत्ती कोसळली. संसाररथाचे एक चाक निखळले. जबाबदारी अंगावर आली. कष्ट वाढले आणि हे कष्ट करता करता त्यांची रचना फुलू लागली. ओव्या रचणाऱ्या या स्त्रीला आपण काव्यनिर्मिती करीत आहोत, याची जाणीवही नव्हती. जात्यातून पीठ सहज पडावे, तशा त्यांच्या रचना घडत गेल्या. अभिजात लाभलेली काव्यप्रतिभा ही त्यांच्या अंतिम श्वासापर्यंत सोबत होती. त्यांचे चिंतनशील सजग मन विविध घटकांचे, प्रसंगांचे, मानवी प्रवृत्तींचे, जीवनव्यवहाराचे निरीक्षण करीत होते. या निरीक्षणातून त्यांची कविता फुलत गेली. वेदनेतून निर्माण झालेली कविता ही हृदयाच्या आतल्या कप्प्यातून येते आणि ती अत्यंत प्रभावशाली ठरते. त्यांच्या कित्येक कवितांना तर तुकोबांच्या रचनांप्रमाणे सुभाषितांचा दर्जा प्राप्त झाला.

इंदिरा संत यांनी बहिणाबाई चौधरींना निसर्गकन्या म्हणून गौरविले आहे. त्या खरेतर भूमीकन्याही आहेत. कारण त्यांच्या अतिशय सुबोध आणि साध्या विषयांवरील सोप्या कवितेतून शेतीविषयक प्रतिमा, निसर्गाचे कौतुक, धरित्रीविषयीचा अभिमान सर्वत्र विखुरलेला आढळतो. त्या स्वत: शेतात राबलेल्या असल्यामुळे शेतीविषयक जाणिवा आणि प्रतिमा त्यांच्या काव्यात विपुलत्वाने आढळतात. त्यांच्या कवितांना लोकगीतांचा बाज जाणवतो.

महाराष्ट्रातील जळगाव, भुसावळ परिसरात जीवन व्यतीत झाल्यामुळे तिथली खानदेशी आणि अहिराणी भाषा हे त्यांच्या काव्याचे विशेष रूप आहे. स्त्रियांची खास अशी वेगळी भाषाही त्यांच्या काव्यातून जाणवते. वरवर दिसायला स्त्री—पुरुषांची भाषा सारखी असली तरी स्त्रियांची काही वैशिष्ट्ये त्यांच्या बोलीतूनही दिसतात. याला कारण जुन्या काळात आर्यांचे भारतात आगमन झाल्यानंतर त्यांना दुसऱ्या समाजातून स्त्रिया स्वीकाराव्या लागल्या. या स्त्रियांनी कालांतराने आर्यांची भाषा आत्मसात केली तरी त्यांची मूळ वैशिष्ट्ये कायम राहिली. बहिणाबाईंची कविता अभ्यासताना स्त्रीभाषेचे असे वेगळे रूप सहजपणे दाखवता येते. या कवितेत स्त्रियांचे दीर्घ उच्चार आहेत. मृदू व्यंजनांचे उच्चार कमी आहेत. शेती, घर, मुलेबाळे हे स्त्रियांचे जग असल्यामुळे त्यातले कितीतरी सूक्ष्म अर्थदर्शक शब्द त्यांच्या कवितेत जागोजागी विखुरलेले आढळतात. 'अवसभर', 'पूनव', 'मामंजी', 'घरोट', 'खिरनी', 'भिलावा', 'हाय' अशा शब्दांनी त्यांनी आपले काव्य सजविले आहे. पूर्वीच्या काळी दळण घरीच जात्यावर म्हणजे घरोट्यावर दळले जात असल्याने गृहिणींचा बहुतांश वेळ दळण्यात जायचा. त्यांनी दळलेल्या पिठातून कुटुंबाची भूक भागली तर त्याच वेळी निर्माण होत गेलेल्या काव्याने समग्र मराठी काव्यप्रांताची भूक भागवली असे म्हणण्यापेक्षा मेजवानी दिली, असेच म्हणावे लागेल.

बहिणाबाईंची भाषा आणि शब्दभांडार हे अहिराणी, खान्देशी बोली भाषेशी आणि प्रदेशाशी संबंधित आहे. 'धांडा', 'तावा', 'चुल्हा', 'बैतन', 'फुकनी', 'धुक्कय', 'मया', 'खय' असे कितीतरी शब्द शहरी रसिक—वाचकांना नवीन वाटतात. 'हातामधी घडाय फुकट गेला याय', 'शिदोळाले आला राग, माले म्हना फन्या नाग', 'भरली येहेर, मोट चाले भराभर, कशाले करतं, कनाचाक कुरकुर', 'आरशी झाली पारखी, आता मी कोनासारखी?' अशा कितीतरी म्हणींचा परिचय होतो.

त्यांच्या काव्याला नटण्यामुरडण्याची हौस नाही, अलंकारांची अपेक्षा नाही, बहिरंगांचा फाजील सोस नाही. ओघाने त्यांचे काव्य वाक्प्रचार, म्हणी आणि प्रतिमांनी नटते. त्यांच्या रचनांच्या प्रतिमांचे अधिष्ठान 'धरित्री' हेच आहे. ती त्यांच्या काव्यात सातत्याने वावरताना दिसते. 'माझी माय सरसोती', 'हिरीताचं देनंघेनं', 'धरित्रीला दंडवत', 'आता माझा माले जीव', 'देव अजब गारोडी' किंवा कितीतरी 'स्फुट ओव्यां'मधूनही ते जाणवते. 'धरित्री'प्रमाणेच 'आभाळ', 'पाऊस', 'मन', 'सपान' याही प्रतिमा भुरळ घालण्याची क्षमता ठेवतात.

*'मन वढाय वढाय, उभ्या पिकातलं ढोर*
*किती हाकला हाकला, फिरी येतं पिकावर'*

('मन', 'बहिणाईची गाणी', पृ. १८)

*'सांग सांग धर्ती माता, अशी कशी जादू झाली*
*झाड गेलं निंघीसनी, मांघे सावली उरली!'*

('आता माझा माले जीव', 'बहिणाईची गाणी', पृ. २२)

अशा रचनांमधील त्यांच्या प्रतिमा वाखाणण्याजोग्या आहेत.

संतांनी आपल्या काव्यनिर्मितीचे श्रेय परमेश्वराला दिले. बहिणाबाईसुद्धा आपल्या रचनांमागे ईश्वरी प्रेरणा असल्याचे नमूद केले. रामदास, तुकाराम, मुक्ताई यांच्या काव्याशी बहिणाबाईंची कविता काहीशी मिळतीजुळती वाटली तरी तिला संतसाहित्य म्हणून

संबोधता येणार नाही; कारण एकोणविसाव्या शतकातील जगण्यात त्यांना आलेले अनुभव त्यांनी आपल्या कवितांमधून चित्रित केले आहेत. त्यात जाणीवपूर्वक प्रबोधनाची पेरणी केली नसून अनुभूतींच्या प्रगटीकरणाबरोबर ओघाने ते येते.

'महाराष्ट्राच्या ओठांवर ज्ञानेश्वरांची ओवी, एकनाथांचे भारुड, तुकारामांचे अभंग आणि बहिणाबाईंची गाणी आहेत. बहिणाबाईंची गाणी जीवनाला स्पर्श करणारी, सहस्रपदरी आहेतच, पण त्यांचं आणखी एक महत्त्वाचं वैशिष्ट्य म्हणजे या गाण्यांमध्ये लय आहे, ताल आहे, गेयता आहे. सुरेख चालींमध्ये ही गाणी म्हणता येतात. असं लय, ताल, गेयता असणारं काव्य कधीही कालबाह्य होत नाही. म्हणूनच शतकापूर्वीची बहिणाबाईंची गाणी आजही आवडीने गायली जातात.'[३] साध्या, सरळ जगण्यातून निसर्गाचे जे अवलोकन होत गेले, तेच बहिणाबाईंनी त्यांच्या कवितेतून प्रतिमांच्या रूपात मांडले. जाणीवपूर्वक नाही, तरी उपमा, उत्प्रेक्षा, रूपक, अनुप्रास, यमक आदी अलंकारांचा समर्पक वापर बहिणाबाईंच्या कवितेत आढळतो. त्यांच्या प्रतिमांचे मूळ 'धरित्री' आहे. बहिणाबाई अस्सल शेतकरी असून घरतीशी जणू त्यांची नाळ जोडली गेली आहे. म्हणूनच 'धरित्री'च्या प्रतिमेतून त्या जन्मदा, सखी अशी विविध नात्यांची गुंफण उलगडून दाखवतात. धरित्री ही काळी, खडकाळ तरीही तिच्यातून उगवणारी फुले, फळे सुंदर, सुगंधी, चविष्ट, विविध रंगांनी परिपूर्ण अशी आहेत. म्हणजे हे सगळे गुण, ही सर्व वैशिष्ट्ये या धरित्रीमध्ये आहेत; पण ती स्वत:जवळ न ठेवता वाटून टाकण्यातच तिला धन्यता वाटते. बहिणाबाईंना यातून सृष्टीच्या आणि ईश्वराच्या मूळ रूपाशी एकच शक्ती निगडित आहे, हेच दाखवायचे आहे.

*'धर्तीमधल्या रसानं, जीभ माझी सवादते*
*तव्हा तोंडातली चव, पिंडामधी ठाव घेते'*

('माझी माय सरसोती', 'बहिणाईची गाणी', पृ. ३)

धरतीप्रमाणेच आभाळही बहिणाबाईंच्या कवितांमधून डोकावते. धरती आणि आभाळ यांना जोडणारा रेशीमबंध म्हणजे पाऊस. निसर्गाशी संबंधित सर्वच घटक बहिणाबाईंच्या जीवनाशी एकरूप झाले होते. त्यांच्या सुखद:खाशी जुळले होते. चैत्र–वैशाखातले ऊन, अमृताची गोडी असणारी 'लौकी' नदी, माहेरच्या वाटेवरचे बाभळीचे वन, काटेगोटे, पाण्याच्या डाबा, वडाची झाडे, पळसाची फुले, सुगरण–साळुंकीसारखे पक्षी, ढगांचा गडगडाट, सुसाट वाहणारा मारोतीचा बाप – वारा, धरतीचा परिमळ, पावसाच्या झडी तर कधी पांडुरंगाचे गीता–भागवत सामावून घेणारा आल्हाददायक पाऊस, मातीतले अंकुर, त्यातून उगवणारे सोने एवढेच कशाला तर बोरी–बाभळींची झाडे आणि त्यांचे शेतीसाठी घातले गेलेले कुंपण, विहिरी, त्यावरील मोट, 'कना', 'चाक', 'वखर', 'नांगर', 'तिफन', 'मोघडा', 'आऊत', 'गोफनी', 'कोयपं', 'इये', 'सरत' अशी शेतीशी संबंधित अवजारे आणि वस्तूही सतत त्यांच्या रचनांतून सहजगत्या अवतरत राहतात. 'पेरणी', 'कापणी', 'रगडणी', 'उपनणी' हे तर त्यांच्या काव्याचे मुख्य विषयच होते.आणि या सर्वांच्या किमयेला पाहून त्यांना 'देव अजब गारोडी' वाटतो आणि त्यांच्या काव्याला अध्यात्माचा स्पर्श होतो.

एकंदरीत काय तर निसर्ग, भूमी आणि शेतकरी, ग्रामीण जीवनाला बहिणाबाईंच्या काव्यात विपुलत्वाने स्थान मिळाले आहे. मात्र या सर्वाचे श्रेय त्या सर्वशक्तिमान परमेश्वराला देतात.

'बहिणाबाईंच्या काव्यात जातिवंत जिव्हाळा आणि अलौकिक प्रतिभा होती. जीवनातील सुखदु:ख, ऊनपाऊस, चढउतार सारख्याच संयमाने पचवून, प्रत्येक क्षण त्या नुसत्या उत्कटतेने जगल्या नाहीत, तर प्रत्येक क्षणाला त्यांनी बोलते केले आणि म्हणूनच वास्तविकता आणि सत्य यांचा स्पर्श झालेले त्यांचे काव्य आपल्या मनाचा ठाव घेते.'[४]

'बहिणाबाईंची काव्यसृष्टी निसर्गप्रतिमांनी खच्चून भरलेली आहे. त्यांची शब्दकला अनुपम आहे. त्यांची चित्रवती भाषाशैली मनोवेधक आहे. त्यांची गाणी प्रासादिक आहेत. श्रवणमधुर आहेत. त्यांच्या गाण्यात आनंद आहे; पण आनंदाची बेहोषी नाही. सुख आहे पण सुखाचं उतणं मातणं नाही. दु:ख आहे पण दु:खाचा आक्रोश नाही. तत्त्वज्ञान आहे, पण तत्त्वज्ञानाचा रूक्षपणा नाही. उपदेश आहे, पण उपदेशातला कोरडेपणा नाही. अलंकरण आहे, पण अलंकारांमुळे कवितेला येणारा बोजडपणा नाही. कल्पनाविलास आहे, पण कल्पनाविलासामुळे येणारी कृत्रिमता नाही. त्यांच्या गाण्यात विनोद आहे, पण विनोदामुळे गांभीर्याला बाधा येत नाही... बहिणाबाईंची गाणी आहेतच तशी अनमोल.'[५]

संत बहिणाबाईंची कविता कुठेच उणी ठरत नाही. ओज, लय, गती, गेयता, रस, अलंकार, भाव, संवाद, विरोध, आत्मनिष्ठा आदी प्रचलित सौंदर्यतत्त्व तसेच अनुभव आणि सत्याचा मनोरम्य आणि जीवनगम्य आविष्कार त्यांच्या कवितेत आढळतो. बहिणाबाई चौधरींचीही गाणी अजरामर झाली आहेत. संगीतबद्ध झाली आहेत, चित्रपटांतून उतरली आहेत. सामाजिक जाणिवा, अध्यात्त्माचा स्पर्श, जीवनविषयक सर्वांग सुंदर तत्त्वज्ञान, दीनदलितांप्रती कणव, शेतकरी आणि ग्रामीण जीवनाशी जुळलेली नाळ, अंधश्रद्धा, व्यसने यांच्याविषयी स्पष्ट मते, सण, स्त्रीजीवन, विनोद, हास्य–कारुण्य, मानवतावाद, उपदेशपरता, संतांविषयी आदर, साहित्याला नव्याने ओळख करून दिलेले ग्रामीण, शेतकरी जीवनात वापरले जाणारे शब्द, वाक्प्रचार आणि म्हणी असे विविधांगी विषय आणि वैशिष्ट्ये यांनी त्यांची कविता बहरली आहे. त्यांच्या एकूणच या दोन्ही तेजस्वी तारकांनी मराठी सारस्वतात स्वत:चे अढळ स्थान निर्माण केले आहे. या व्यक्तिमत्त्वांना आणि त्यांच्या कार्यकर्तृत्वाला विनम्र अभिवादन!

निष्कर्ष —

१. संत बहिणाबाई आणि बहिणाबाई चौधरी या दोघींचीही कोटुंबिक पार्श्वभूमी विपरित आहे, त्यामुळे अपार कष्ट हेच दोघींच्याही जीवनाचे सार आहे.

२. अपार कष्ट करताना या दोघींनाही त्यांच्या पतीची साथ लाभलेली नाही. संत बहिणाबाईंचा पती तापट, संशयी होता,तर बहिणाबाई चौधरींना दुर्देवाने लवकरच वैधव्य आले.

३. संत बहिणाबाईंच्या पतीने उलट बहिणाबाईच्या आध्यात्ममार्गात वारंवार अडथळे आणले. त्यावर मात करीत बहिणाबाई परमार्थात उच्च स्थान प्राप्त करत्या झाल्या.

४. बहिणाबाई चौधरींना पतीची साथ नव्हती. शिवाय आर्थिक बाजूही कमकुवत होती, तरीही मुलांचा सांभाळ करीत त्यांनी आयुष्यात खूप मोठे स्थान प्राप्त केले.

५. या दोघींनीही सांसारिक जबाबदाऱ्या नीट पार पाडल्या. त्याचेच फळ म्हणजे दोघींचीही मुले कतृत्ववान निपजली.

६. या दोघींचेही काव्य अजरामर असे आहे. त्यात सौंदर्यासोबतच उच्च कोटीचे तत्त्वज्ञान पहावयास मिळते.

७. स्त्रीसुलभ सहजता हे दोघींच्याही काव्याचे वैशिष्ट्य आहे.

८. दोन्ही कवयित्रींचा कालखंड, पार्श्वभूमी, परिस्थिती पूर्णतः वेगळी असली तरी अलौकिक अनुभूतीमुळे त्यांच्यात काहीसे साम्य आढळते. त्यांच्या कश्टमय चरित्रांची पार्श्वभूमी, त्यावर त्यांनी गाठलेली आध्यात्मिक उंची, संसाराचा गाडा ओढताना त्यातुनच आपला आनंद शोधणे, जीवनाच्या पाउलवाटेवरचे आपले अनुभव काव्यातून टिपणे, साध्या संसारी स्त्रियांचे हे अनुभव रसिकांना अनुपम्य असा काव्यानंद देणारे असणे अषा अनेक गोष्टी त्यांच्या बाबतीत समान आहेत. म्हणूनच साहित्यनभात या दोन तेजस्वी तारका आजही आपल्या तेजाने तळपत आहेत.

संदर्भ :


१. शेणोलीकर, ह.श्री., प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप, तृतीय खंड, १६५० ते १८४०, सहावी आवृत्ती, मोघे प्रकाशन, कोल्हापूर, १९८७, पृ. १६०
२. मांडवकर, डॉ. पवन, दोन शब्द, बहिणाईची गाणी: सौंदर्य आणि समीक्षा, सेवा प्रकाशन, अमरावती, प्रथमावृत्ती, २०१३, पृ. ५
३. धुप्पड, माया, बहिणाबाई चौधरी आणि त्यांच्या सहस्रपदरी कविता, अक्षररंग पुरवणी, दै. लोकमत, पुणे, दि. ३–१२–२०००, पृ. १.
४. वरुडकर, माधुरी, निसर्गकन्या, अक्षररंग पुरवणी, दै. लोकमत, पुणे, दि. १–१२–२००२, पृ. ३.
५. कऱ्हाडे, सदा, 'बहिणाबाईची गाणी — एक चिंतन', बहिणाईची गाणी, बहिणाबाई चौधरी, सुचित्रा प्रकाशन, मुंबई, सातवी आवृत्ती, १९९९, प्रा.पृ. ५९.


✠ ✠ ✠


Published Details

Don Tejaswee Tarka : Bahinabai ani Bahinabai, Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ) ISSN 2394-8426, Sept. 2015, Issue II, Vol. III, pp. 30-38